CMYK

दैनिक
# आरंभ मराठी
www.arambhmarathi.com

सुविचार
स्वतःवर प्रेम करा, कारण तुम्हीच तुमच्या आयुष्याचे शिल्पकार आहात



धाराशिवच्या आरोग्य सेवेत सुधारणा; रुग्णांना सोलापूरला रेफर करण्याचे प्रमाण घटले
पेज 4

■ दैनिक ■ धाराशिव ■ अंक 191 ■ गुरुवार,दि . 21 ऑगस्ट 2025 ■ RNI NO -2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू 5

# गणेशोत्सवाच्या स्वागताला धाराशिव सज्ज

## गणेश मूर्तींना राज्याबाहेरूनही मागणी, मूर्तिकारांची लगबग, १५ फुटांपर्यंत मूर्तींची विक्री, पावसाने कामात येतोय व्यत्यय



आरंभ मराठी | धाराशिव



गणेशोत्सवाची चाहूल लागल्याने धाराशिव शहरात सध्या उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. श्री गणेशाच्या आगमनासाठी केवळ काही दिवस शिल्लक असून, शहरातील गणेश मूर्ती कलाकार मूर्ती कामात गुंतले आहेत. धाराशिव हे गणेश मूर्ती बनविण्याचे एक महत्त्वाचे केंद्र बनत असून, येथे बनलेल्या वैशिष्ट्यपूर्ण गणेश मूर्ती केवळ महाराष्ट्रातील प्रमुख शहरांमध्येच नव्हे, तर शेजारच्या कर्नाटक, आंध्र प्रदेशात देखील मोठ्या प्रमाणावर पाठवल्या जातात.जुन्या शहरात तसेच सांजा रोड भागात मूर्तीवर मूर्तीला रंगकाम करण्याच्या कामात व्यस्त आहेत. यावर्षीच्या गणेशोत्सवात आकर्षक, आधुनिक तसेच प्रासंगिक स्वरूपाच्या मूर्तींना मोठी मागणी असल्याचे कलाकार सांगतात. पर्यावरणपूरक गणेश मूर्तींचीही मागणी वाढत असून, शाडूच्या मूर्तींसोबत मातीच्या मूर्तींचे बुकिंग चांगले आहे. अनेक घरगुती मंडळे 'थीम बेस्ड' मूर्तींची मागणी करत आहेत.समाजातील विविध प्रश्नांवर प्रकाश टाकणाऱ्या कलाकृतींद्वारे कलाकारांनी आपला ठसा उमटविला आहे.

### बुकिंगची लगबग

शहरातील प्रमुख मूर्तिकारांकडे दोन महिने आधीच मूर्तींच्या बुकिंगला सुरुवात झाली होती. सध्या अंतिम टप्प्यातील काम सुरू असून तयार मूर्तींना रंग देण्याचे काम झपाट्याने चालू आहे. लहान आकारातील (६ ते १२ इंच) घरगुती मूर्तींपासून मोठ्या उंचीच्या (१० ते १२ फूट) मंडपांसाठीच्या मूर्तींपर्यंत विविधता दिसून येते. काही कलाकारांनी तर खास ग्राहकांसाठी वैयक्तिकृत मूर्ती तयार केल्या आहेत.

### महाराष्ट्राबाहेरूनही मागणी

धाराशिवमधील मूर्तींची गुणवत्ता आणि कलात्मकता पाहता कर्नाटकातील बीदर, गुलबर्गा, बेलगाव तसेच आंध्र प्रदेशातील आदिलाबाद, नांदेड सीम `वरील गावांतून मागणी येते. अनेक व्यापारी स्वतः येऊन मूर्ती निवडून नेतात. त्यामुळे धाराशिवचा गणेशोत्सवाचा ठसा शेजारील राज्यांतही उमटलेला दिसतो

### मूर्ती खरेदीला जोरदार प्रतिसाद

या वर्षी कलाकारांनी पर्यावरणपूरकतेवर भर दिला असून शाडूच्या मूर्तींना नैसर्गिक रंग वापरण्यात येत आहेत. काही मूर्तींमध्ये भारतीय अंतराळ मोहिम ांपासून ते राममंदिराच्या संदर्भापर्यंतची झलक दिसते. तसेच लहान मुलांसाठी आकर्षक व हलक्या वजनाच्या मूर्तींची खास श्रेणी ठेवली आहे. दरवर्षीच्या तुलनेत यावर्षी गर्दी पुन्हा वाढली असून, विक्रीचा उत्साह दुप्पट झाल्याचे चित्र आहे.



### कलाकारांची मेहनत, भाविकांची उत्सुकता

गणेशोत्सव म्हणजे केवळ श्रद्धेचा सोहळा नाही, तर रोजगाराचेही मोठे साधन आहे. शहरातील १२ ते १४ मूर्तिकारांकडे अनेक कारागीर रात्रंदिवस काम करत आहेत. भाविकही आपल्या बाप्पाची मूर्ती निवडण्यासाठी कुटुंबासह त्यांच्याकडे धाव घेत आहेत. अनेक मंडळाचे पदाधिकारी देखील आपल्या आवडीच्या गणरायाच्या मूर्तीची निवड करण्यासाठी मूर्तिकारांकडे जात आहेत. धाराशिवच्या गणेश मूर्तींची ख्याती आता राज्याच्या सीमेपलीकडे पोहोचली आहे. पारंपरिकता, कलात्मकता आणि आधुनिकतेचा संगम असलेल्या या मूर्तींमुळे यावर्षीचा गणेशोत्सव अधिकच मंगलमय होणार आहे.

## २० दिवसांच्या प्रतीक्षेनंतर आजपासून तुळजाभवानी मातेचे धर्मदर्शन व पेडदर्शन सुरू

सूरज बागल | आरंभ मराठी

तुळजापूर -तुळजाभवानी मंदिरातील सिंहगाभाऱ्यातील जीर्णोद्धार कामामुळे गेले वीस दिवस बंद असलेले श्री तुळजाभवानी मातेचे धर्मदर्शन व पेडदर्शन गुरुवार, २१ ऑगस्टपासून पुन्हा पूर्ववत सुरू होणार असल्याची माहिती मंदिर संस्थानतर्फे देण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पुरातत्त्व विभागामार्फत मंदिरात जीर्णोद्धाराचे काम सुरू आहे. या कामाच्या कारणास्तव १ ऑगस्टपासून धर्मदर्शन व पेडदर्शन बंद ठेवण्यात आले होते. सुरुवातीला दहा दिवसांसाठी बंदी घालण्यात आली होती, मात्र पुढे हा कालावधी वाढवून २० दिवस करण्यात आला. या काळात हजारो भाविकांना देवीचे जवळून दर्शन घेता आले नव्हते. मात्र आता उद्यापासून भाविकांना नेहमीप्रमाणे धर्मदर्शन व पेडदर्शनाची सुविधा उपलब्ध होणार आहे. तसेच मंदिरातील इतर सर्व धार्मिक विधी आणि पूजा-अर्चा देखील नियमितपणे सुरू राहतील, असे मंदिर संस्थानकडून स्पष्ट करण्यात आले आहे..



## मराठा आरक्षण रथयात्रा तुळजापुरात,उत्स्फूर्त स्वागत




आरंभ मराठी | तुळजापूर

मराठा समाजाच्या न्याय्य आरक्षणाच्या मागणीसाठी राज्यभर काढण्यात आलेल्या मराठा आरक्षण रथयात्रेचा बुधवारी तुळजापूर येथे उत्स्फूर्त स्वागत सोहळा पार पडला. मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक रामभाऊ गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेली ही रथयात्रा पंढरपूर व सोलापूर मार्गे श्री क्षेत्र तुळजापुरात दाखल झाली. श्री तुळजाभवानी देवीच्या चरणी नतमस्तक होऊन रथयात्रेच्या यशस्वीतेसाठी प्रार्थना करण्यात आली. मंदिर परिसरात हर हर महादेव, जय भवानी, जय शिवराय च्या घोषणांनी वातावरण दुमदुमून गेले. समाजबांधव, कार्यकर्ते व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून रथयात्रेचे स्वागत केले.तुळजापूरनंतर रथयात्रा लातूरकडे मार्गस्थ झाली असून, प्रत्येक ठिकाणी होणाऱ्या स्वागत व सभा यामुळे जनतेमध्ये मोठ्या प्रमाणात उत्साह पाहायला मिळत आहे. समाजातील तरुणाई, महिला व ज्येष्ठ नागरिक यांचा सक्रिय सहभाग रथयात्रेला बळ देत असून, राज्यव्यापी ही चळवळ आता निर्णायक टप्प्याकडे वाटचाल करत आहे.

## महाप्रसादाने मुद्गलेश्वर मंदिरात श्रावण महिन्याच्या उत्सवाची सांगता

आरंभ मराठी | तुळजापूर

शहराजवळील सिंदफळ शिवारातील मुद्गुलेश्वर मंदिरात श्रावण महिन्याच्या उत्सवाची महाप्रसादाने सांगता करण्यात आली यावेळी हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला .दरवर्षी श्रावण महिन्याच्या अखेरीस या महाप्रसादाचे आयोजन केले जाते संपूर्ण महिन्यांमध्ये तुळजापूर शहरासह ग्रामीण भागातील भाविक मोठ्या संख्येने मुद्गुलेश्वर येथे दर्शनासाठी येतात यासाठी मोठ्या प्रमाणावर महाप्रसादाचे आयोजन करण्यात येत असते या महाप्रसादाचा हजारो भाविकांनी लाभ घेतला यावेळी संपूर्ण मंदिर आकर्षक फुलांनी सजवण्यात आले होते तर मंदिराच्या आतील भागातील आकर्षक अशी सजावट करण्यात आली होती जी पाहण्यासाठी लोकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी झाली होती.



## 'समृद्धी'च्या धर्तीवर नांदेड-जालना मार्गासाठी मोबदला देण्याच्या पर्यायाचा विचार करावा

### महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

आरंभ मराठी | मुंबई

नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गाच्या धर्तीवर नांदेड-जालना द्रुतगती मार्गासाठीही जमीन संपादनाचा मोबदला निश्चित करण्याच्या पर्यायाचा विचार केला जावा, असे निर्देश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. जालना जिल्ह्यातील भूसंपादनाबाबत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मंत्रालयातील दालनात आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीला वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर उपस्थित होते. तर आमदार सर्वश्री अर्जुन खोतकर, नारायण कुचे, कैलास गौरंट्याल यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. बैठकीत समृद्धी महामार्गासाठी जमीन मूल्यांकन, झाडे व घरांची नुकसान भरपाई आणि झोपड्यांचे नियमितीकरण आदी मुद्यांवर देखील चर्चा करण्यात आली. महसूलमंत्री श्री.बावनकुळे म्हणाले, समृद्धी महामार्गासाठी जो दर देण्यात आला त्याचा अभ्यास करुन तो दर देणे शक्य आहे का ते पाहावे, अथवा रेडीरेकनरच्या दरानुसार अधिसूचनेच्या आधीच्या तीन वर्षात खरेदीखताचा जो सर्वाधिक दर असेल तो गृहीत धरुन त्यावर प्रतिवर्षी १० टक्के वाढ करावी. या दोन्ही पर्यायांपैकी जो दर शेतकऱ्यांना मान्य असेल त्याप्रमाणे जिल्हा प्रशासनाने प्रस्ताव सादर करावा. जालना शहराजवळील ज्या जागांचे बाजारभाव अधिक असतील त्यांना सानुग्रह अनुदान देता येईल का ते तपासून पाहण्याची सूचनाही त्यांनी केली. त्याबरोबरच फळबागा आणि घरांच्या भरपाईचा आराखडा तयार करण्यात यावा, असेही त्यांनी सांगितले. झोपडपट्ट्यांमधील पात्र लाभार्थ्यांना पट्टे वाटप करा जिल्ह्यातील नगरपालिका/ महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्ट्यांचे सर्वेक्षण करावे. २०११ पूर्वीच्या घरांना नियमित करुन त्यांना सर्वांसाठी घरे योजनेअंतर्गत पट्टे वाटप करण्यात यावे. याअनुषंगाने नागपूर येथे झालेल्या कामाची माहिती घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या अधिकारातील बाबींवर तातडीने निर्णय घ्यावा तसेच जी प्रकरणे शासनाकडे पाठविणे आवश्यक असेल ते प्रस्ताव शासनाकडे पाठवावेत, असेही मंत्री श्री.बावनकुळे यांनी यावेळी स्पष्ट केले.

## मुंबई आंदोलनाची तयारी गुप्त ठेवा; आंदोलकांचे आवाहन

### पोलिस अधीक्षक म्हणाल्या,अशी माहिती जमा केली जात नाही

आरंभ मराठी | धाराशिव

मराठा आरक्षणाचा प्रश्न पेट घेत असताना पुन्हा एकदा राज्याचे लक्ष २९ ऑगस्टकडे लागले आहे. या दिवशी मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मुंबईत उपोषण सुरू होत आहे. यामुळे गावोगावी मोठी चळवळ उभी राहत असून, मोर्चासाठी कार्यकर्त्यांची जमवाजमव सुरू आहे.याच पार्श्वभूमीवर गेल्या दोन दिवसांपासून गावांतील पोलिस पाटील यांच्याकडे आंदोलनाच्या तयारीसंबंधी माहिती जमा करण्याचे आदेश देण्यात आल्याची चर्चा सुरू झाली. अनेक मराठा सेवकांकडेही फोनद्वारे विचारणा होत असल्याचे बोलले जाऊ लागले. या कारणामुळे कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते.मात्र, आंदोलकांनी ठाम भूमिका घेत नागरिकांना आवाहन केले आहे की गावातील जाणाऱ्यांची यादी, कोण किती लोक मुंबईकडे रवाना होत आहेत याबाबतची माहिती पोलिसांना किंवा पोलिस पाटील यांना देऊ नये. तसेच ही माहिती कुठल्याही ग्रुपमध्ये किंवा सोशल मीडियावर शेअर करू नये. आरक्षणाच्या लढ्याला बळ देण्यासाठी तयारी गुप्त ठेवली तरच खरी ताकद उभी राहील, असा इशारा आंदोलकांनी दिला आहे.दरम्यान, या संपूर्ण घडामोडींवर स्पष्टीकरण देताना धाराशिवच्या प्रभारी पोलीस अधीक्षक शफाकत आमना यांनी आरंभ मराठीला सांगितले की, पोलिसांकडून अशा प्रकारची कोणतीही माहिती घेतली जात नाही. नागरिकांनी या संदर्भात गैरसमज करून घेऊ नये.

आरंभ मराठी

## महसूलच्या गोंधळावर शेतकऱ्यांचा संताप: नुकसान दिसतंय, पण पंचनामा अनिश्चित

# उघडा डोळे, बघा नीट, पंचनाम्यासाठी का पायपीट ?

विक्रांत उंदरे | आरंभ मराठी

वाशी; तालुक्यात गेल्या आठवड्यात झालेल्या ढगफुटी सदृश पावसामुळे शेतकरी संकटात सापडले आहेत. सोयाबीनसह इतर पिकांचे मोठे नुकसान झाले असून ,शेतीचे क्षेत्र पाण्याखाली गेले आहे. कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी स्वतः पाहणी करून सर्व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे सरसकट पंचनामे होतील,अशी घोषणा केली होती. मात्र सात दिवस उलटून गेले तरी पंचनाम्याबाबत कमालीचा संभ्रम आहे. सगळं दिसत असूनही पंचनाम्याची प्रक्रिया का होत नाही, याबाबत कोणतीही स्पष्टता का येत नाही,हे स्पष्ट नसल्याने शेतकऱ्यांचा संताप वाढला आहे. तहसील कार्यालय व कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना ठोस माहिती मिळत नाही. कुणी जियो टॅग फोटोची मागणी करतो, तर कुणी अधिकारी प्रत्यक्ष येतील असे सांगतो. या परस्परविरोधी सूचना आणि वावड्यांमुळे शेतकऱ्यांत संभ्रम व असंतोष निर्माण झाला आहे. नुकसान भरपाईसाठी पंचनामे आवश्यक असतानाच प्रशासनाकडून माहिती न दिल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. काही ठिकाणी अधिकारी केवळ मुख्य रस्त्यावर येऊन पंचनामे करून परत गेल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. शेतात पाणी साचले आहे, पीक पूर्णपणे उध्वस्त झाले आहे. अधिकारी रस्त्यावरून गेले,पंचनामा होणार की नाही?, असा सवाल शेतकरी बाळासाहेब उंदरे यांनी उपस्थित केला.



### अशिक्षित व वृद्ध शेतकऱ्यांची अडचण

जियो टॅग फोटोसंदर्भात तहसीलदार प्रकाश म्हेत्रे यांनी सूचना केल्या असल्या तरी ग्रामीण भागातील वृद्ध व अशिक्षित शेतकऱ्यांना या तांत्रिक प्रक्रियेचे ज्ञान नाही. परिणामी त्यांना इतरांवर अवलंबून राहावे लागत आहे. त्यामुळे अनेक शेतकरी भरपाईपासून वंचित राहण्याची भीती व्यक्त होत आहे.

### शेतकऱ्यांची सरसकट मदतीची मागणी

पिकांचे नुकसान डोळ्यांना दिसत आहे, मग पंचनाम्याच्या विलंबामुळे शेतकरी मदतीपासून वंचित का राहावेत?, असा प्रश्न शेतकऱ्यांतून उपस्थित होत आहे. पंचनामे तांत्रिक व प्रशासकीय अडथळ्यांमुळे वेळेत पूर्ण होणार नाहीत, हे लक्षात घेऊन शेतकऱ्यांना सरसकट मदत जाहीर करण्याची मागणी होत आहे.

### मानवी संसाधनांचा अभाव पंचनामा अशक्य

सततचा पाऊस, शेतरस्त्यांची दुरवस्था, दुर्गम भागातील अडथळे आणि अधिकारी-कर्मचारी वर्गाचा अभाव या कारणांमुळे प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामे करणे अवघड असल्याचे प्रशासनाकडून सांगितले जाते. मात्र याचा परिणाम शेतकऱ्यांवर होतो आहे. नुकसानीची परिस्थिती डोळ्यासमोर असतानाही पंचनामा विलंबित आहेत.

### प्रशासनाने स्पष्टता द्यावी,संभ्रम दूर करावा

पंचनाम्याबाबत जिल्हा प्रशासनाकडून तातडीने प्रसिद्धीपत्रकाद्वारे माहिती देणे अत्यावश्यक असल्याचे मत शेतकरी संघटनांनी व्यक्त केले आहे. स्पष्टता न झाल्यास शेतकऱ्यांचा रोष तीव्र आंदोलनात परिवर्तित होण्याची शक्यता नाकारतायेतनाही.

## दाळींब येथील तलाठी कार्यालयाची दुरावस्था

आरंभ मराठी | दाळींब

उमरगा तालुक्यातील दाळींब येथील राष्ट्रीय महामार्गालगत आसलेल्या शासकीय विश्राम गृहासमोर दाळींब सज्जाचे तलाठी कार्यालय असून, या तलाठी कार्यालयाचे बांधकाम काही वर्षांपूर्वी करण्यात आले आहे मात्र या तलाठी कार्यालयाच्या (छत) स्लॅपला गळती लागली आहे. यामुळे कार्यालयातील फर्निचर भिजुन फर्निचरचे व शासकीय कामकाजासाठी नागरिकांनी दाखल केलेली खरेदीखत, गहाणखत,बोजा,हक्कसोड,बक्षीस पत्र,कोर्ट डिग्री आदी कागदपत्रे नागरिक याठिकाणी दाखल करतात. ही संचिका जमा या कार्यालयात आसतात सध्या पावसाळा चालू आहे या पावसामुळे छत गळत असल्याने फर्निचर व कागदपत्रे (संचिका)भिजत असल्याने तलाठी व नागरिकांना यांचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे तसेच तलाठी कार्यालयाची फरशी,रंगरंगोटी, खिडक्या,दरवाजे व होत असलेली छत गळती आदी तात्काळ दुरूस्ती करून झालेली दुरावस्था दूर करण्याची मागणी नागरिक करत आहेत.

CMYK

दैनिक आरंभ मराठी

www.arambhmarathi.com

संपादकीय

गुरूवार,दि.21ऑगस्ट 2025

# मुखी हरिनाम,नेत्र पैलतीरी-नामयाची दासी जनी

**संत जनाबाई यांचा अभंग.**

इसवी सनाचे तेरावे शतक. महाराष्ट्राच्या या पवित्र भूमीत , अध्यात्मिक क्षेत्राची, वारकरी/भक्ती संप्रदायाची पायाभरणी झाली. मराठी भूमीच्या इतिहासात ते शतक अधिकच महत्वपूर्ण, शोभिवंत ठरते. ते कसे ते पुढील अभंगातून स्पष्ट होते

संतकृपा झाली । इमारत फळा आली ।।१।।
ज्ञानदेवें रचिला पाया । उभारिलें देवालया ।।२।।
नामा तयाचा किंकर । तेणें केलासे विस्तार ।।३।।

तेराव्या शतकातच या इमारतीच्या पायभरणीला सुरुवात झाली. ज्या संत ज्ञानदेवांनी भगवद्गीतेवर मराठी भाषेतली पहिली टीका भावार्थ दीपिका लिहून ही पायाभरणी केली आणि संत नामदेवांनी तिचा विस्तार आपल्या अभंग आणि पदांमधून भारतभर केला. गोरा कुंभार, चोखामेळा, बंका महार अशा विविध जातिपंथाच्या संतांनी त्या कार्याचा भार वाहिला. त्याच काळी अजून दोन हात या कामी झटले ते होते संत जनाबाई यांचे. त्यांचे सुदैव असे की या काळात त्या जन्माला आल्या आणि या संतश्रेष्ठांच्या मांदियाळीत त्या वावरल्या. त्या काळात कोणकोणत्या संतांनी ही इमारत उभारली आणि विठ्ठलाला लेकुरवाळा बनवले ते जनाबाई यांनीच एका अभंगातून फार गोड सांगितले आहे.

विठू माझा लेकुरवाळा, संगे गोपाळांचा मेळा। निवृत्ती हा खांद्यावरी सोपानाचा हात धरी। पुढे चाले ज्ञानेश्वर। मागे मुक्ताई सुंदर।
गोरा कुंभार मांडीवरी चोखा जीवा बरोबरी। संत बंका कडेवरी , नामा करांगुळी धरी । जनी म्हणे गोपाळा करी भक्तांचा सोहळा

म्हणजे तो काळ किती महान होता ज्या काळात हे सगळे जण इथे प्रत्यक्ष रहात होते. जनाबाईला या सर्वांचा सहवास लाभला. त्यांच्या संगतीत विठ्ठलाला आळवता आले. त्याच्या भक्तीत ती रममाण झाली. स्वयं विठ्ठल तिचा माय बाप , बंधू आणि सखा झाला. संत नामदेवांसारखा विद्वान गुरू तिला मिळाला. स्वतःला नामयाची दासी म्हणवून घेण्यात जनाबाईने कधीही कमीपणा मानला नाही. इतरही समकालीन संतांचा सहवास पंढरी नगरीत तिला लाभला. त्यांचे मार्गदर्शनही मिळाले. तिथे संतांची मांदियाळी जमली म्हणतात ती अशी.





राम आरडले.
९४२३८२७२३६

अशी बोलते कविता

मराठवाड्यातल्या परभणी जिल्ह्यातील गोदावरी काठी वसलेल्या गंगाखेड या लहानश्या खेड्यात मातंग समाजात एका गरीब दाम्पत्याच्या पोटी जनीचा जन्म झाला. वयाच्या पाचव्या सहाव्या वर्षीच ती वडिलांसोबत पंढरपूरला आली. ती परत गेलीच नाही. तिथेच राहिली. तिच्या वडिलांनी तिला संत नामदेव यांचे वडील दामाशेटी यांच्याकडे सोपवले. ती त्यांच्या घरी दासी बनून राहू लागली. घरातली सगळी कामे ती इमानेइतबारे करायची. दिवसभर राबायची, काबाडकष्ट करायची. पण हे करताना सतत विठ्ठलाचेच चिंतन करायची. तिच्या ध्यानी-मनी केवळ नि केवळ विठ्ठलंच भरून राहिला होता. तो तिला तिच्या सगळ्या कामात मदत करण्यासाठी यायचा. जातं ओढायचा, दळण दळायचा, गोवऱ्या सुद्धा थापू लागे. म्हणून तर तिच्या गोवऱ्यातून विठ्ठल विठ्ठल असा आवाज येई. याची प्रचिती खुद्द संत कबिरांनी घेतल्याची एक सुंदर कथा सांगितली जाते. विठ्ठल तिच्या घरी यायचा , तिला न्हाऊ सुद्धा घालायचा, तिची वेणी फणी करायचा. यावरून एकदा रुक्मिणीने त्यांच्या नात्यावर शंका घेतली अशीही कथा आहे. एकदा दळण दळण्यासाठी विठ्ठल तिच्याकडे आला आणि जाताना गळ्यातला सोन्याचा हार तिथेच विसरला. तो हार जनीने चोरला असा आळही तिच्यावर आला. जनीच्या आयुष्यात अशा अनेक कथा आहेत. त्या किती खऱ्या अन किती खोट्या हे माहीत नाही पण यावरून एक गोष्ट मात्र पक्की होते की जनीचं आयुष्य संपूर्णपणे विठ्ठलमय होतं. त्याशिवाय अथवा त्यापलीकडे दुसरं, तिसरं काहीही नव्हतं. जनीला कधी कधी विठ्ठलाचा रागही यायचा ती मंदिराबाहेर उभारून त्याला शिव्याही घालायची.

अरे विठ्या विठ्या ।मूळ मायेच्या कारट्या ।।१।।
तुझी रांड रंडकी झाली । जन्मसावित्री चुडा ल्याली ।।२।। तुझें गेलें मढें ।तुला पाहून काळ रडे ।।३।
उभी राहूनि आंगणीं ।शिव्या देत दासी जनी ।।४।।

किती मोठा अधिकार ..
काय ते नातं .. देव आणि भक्ताचं ..

इयत्ता पाचवीच्या अभ्यासासाठी दिलेला संत जनाबाईचा अभंग असा आहे ..

आंधळ्याची काठी । अडकली कवणें बेटीं ।। १ ।।

सदरील अभंगात जनाबाईना विठ्ठलाच्या दर्शनाची आत्यंतिक ओढ लागली आहे असं दिसून येतं. ती अगदी आतुर होऊन , आर्त स्वरात विठ्ठलाला विनवणी करत आहे. पहिल्या चरणात तिने विठ्ठलाला आंधळ्याची काठी म्हटलं आहे. आता आंधळ्या व्यक्तीला त्याच्या काठीचं जे महत्व असतं ते इतरांना कदाचित समजणार नाही. ती त्याचा वाटाड्या असते. मार्ग दाखवते. सांभाळून घेते. रक्षण करते. आधार देते. म्हणजे त्याच्यासाठी ती खूप काही असते. अनेक अंगाने तिचं महत्व आहे. मग एका भक्ताला आपला देवही तितकाच महत्वाचा, मोलाचा असतो. यासाठी ही उपमा किती समर्पक ठरते ते लक्षात येते.

माझिये हरणी । गुंतलीस कोणे रानीं ।। २ ।। मुकें मी पाडस । चुकलें भोवें पाहें वास ।। ३ ।।

इथे जनाबाई स्वतःला हरिणीचे पाडस म्हणवतात. ते पाडस वाट चुकले आहे. भांभावले आहे. गोंधळले आहे, काही सुचत नाही, मार्ग सापडत नाही. काय करू काय नाही असे त्याला झाले आहे. अशा प्रसंगी आठवणारी सर्वात जवळची व्यक्ती असते ती आईच. तीच आता यातून आपल्याला सोडवेल याची खात्री असते. म्हणून जनाबाई देवाला माझे हरिणी असे संबोधित करत आहेत. माझ्या या वाट चुकलेल्या पाडसाला वाट दाखवायला तू लवकर ये अशी आर्त विनवणी करत आहेत.

तुजवीण काय करूं । प्राण किती कंठीं धरूं ।। ४ ।।
आतां जीव जाऊं पाहे। धांव घालीं माझे आये । ।। ५ ।।

तुझ्याशिवाय मी कधीच करू शकत नाही. आता माझा प्राणही जाण्याची वेळ आली. तू लवकर धाव घे. मी अस्वस्थ आहे . जनाबाई इथे जी तळमळ दाखवतात ती या सांसारिक गोष्टींची आहे. हे सर्व आता तिला नकोसं झालंय . आता पुरे. मला तुझ्या चरणाशी जागा दे. तुझ्याविना मला दुसरं काहीच नको आहे. माझी ही तहानभूक केवळ तुझ्या भेटीची आहे. तू भेटल्याशिवाय ती शमणार नाही. तू धावत ये ,लवकर ये. माझे प्राण जाण्याआधी ये. इथे ती विठ्ठलाला आईच म्हणून हाक मारते. तुझ्या लेकराची ही हाक ऐक. आईशिवाय दुसरं कोण इतक्या तळमळीने येणार आहे?

माझी भेटवा जननी।संतां विनवी दासी जनी ।। ६ ।

शेवटच्या चरणात जनाबाई सगळ्या संतमंडळींना विनवते आहे. माझ्या आईची नि माझी भेट घालून द्या. हे काम आता तुम्हीच करू शकता. तुमचा तो अधिकार आहे. मी हक्काने तुमच्यापाशी मागते आहे. माझ्या विठू माऊलीची माझ्याशी भेट घडवून आणा. माझी हीच एक अंतिम आस उरली आहे. मला तिच्या चरणी विलीन होऊ द्या. मी खूप व्याकुळ झाले आहे. वेदनेने विव्हळते आहे. तडफडत आहे. हे संतानो , माझ्या भावांनो मला माझ्या जननीला एकदा भेटवा. ही दासी जनी तुमच्या पुढे हात पसरते, याचना करते. मला ते दान द्या. माझ्या विठुमाउलीला भेटवा.

अशी ही जनाबाई शेवटी आपल्या गुरुसोबत म्हणजे संत नामदेवांसोबत पंढरीश पांडुरंगाच्या चरणी विलीन झाली. नामदेवांना पंढरीत मंदिराच्या पहिल्या पायरीवर जागा मिळाली. जिला आपण नामदेव पायरी म्हणतो. तिचे दर्शन घेतल्याशिवाय कोणताही भक्त आत प्रवेश करत नाही. त्याच पायरीत संत जनाई आपल्या गुरुसोबत विलीन झाली असे म्हणतात. तिने अढळ स्थान प्राप्त केले.

एक दासी, मोलकरीण म्हणून काम करणारी सम ाजातील खालच्या स्तरातून आलेली अशिक्षित, अडाणी स्त्री आपल्या आर्त भक्तीने विठ्ठलावर केवढा मोठा अधिकार प्राप्त करू शकते हे जनाबाईने दाखवून दिले. भक्तीचा कोणताही अवडंबर न माजवता, रोजच्या काम ातूनही कशी भक्ती करता येते याचे मूर्तिमंत उदाहरण जनीने सर्वांना दाखवले. स्वतःला सतत दासी जनी म्हणवून घेणाऱ्या जनाईला स्वतः पांडुरंग तिचा दास बनून साधी घरघुती कामे करू लागतो. ही दासी संत पदाला जाऊन पोहोचते. हे केवळ मनापासून केलेल्या भक्तीनेच साधू शकते. फार विद्वान , पंडित, शास्त्राचा जाणकार असण्याची गरज नाही. हृदयाच्या कप्प्यात त्या परमेशाला साठवले की तो तिथे आनंदाने राहतो. धरिला पंढरीचा चोर, गळा बंधुनिया दोर हे तेंव्हाच म्हणता येतं. त्यासाठी जनीइतकं समर्पित व्हावं लागतं. तेव्हाच तो आपल्या हाती लागतो. स्वतःला भक्ताच्या भावबंधनात बांधून घेतो.

# उंटावरून शेळ्या हाकणे केव्हा बंद होईल?

आपण नेहमी पाहतो की बहुतांश क्षेत्रातील काही व्यक्ती उंटावरुन शेळ्या हाकण्याचे काम करतात.ते इतके बेजबाबदारपणे वागतात की त्यांची कीव सुध्दा करावी वाटत नाही.उंटावरुन शेळ्या हाकणारे लोक स्वतःला खूप चाणाक्ष आणि स्मार्ट समजतात.चारचौघांत त्यांचे बोलणे आणि वागणे एकदम वेगळे आणि अतिशयोक्तीने ठासून भरलेले असते.वासरात लंगडी गाय शहाणी ही म्हण सुध्दा त्यांना तंतोतंत लागू पडते.एकतर हे लोक स्वतः वाईट वागतात आणि दुसरीकडे त्यांची अशी धारणा असते की इतरांनी मात्र चांगले वागले पाहिजे.अशा विचित्र आणि दुटप्पी लोकांच्या वर्तनाकडे पाहिले की मनात विचार तरळतो, बापरे, अशा लोकांचे उंटावरून शेळ्या हाकणे केव्हा बंद होईल? शेळ्या हाकणे म्हणजे शेळ्या राखणे हे काम वरवर पाहता साधे व क्षुल्लक काम वाटते.परंतु,शेळ्या हाकण्याचे काम फार जिकिरीचे असते.कारण शेळी हा प्राणी मेंढी प्राण्यांसारखा शिस्तबद्ध नाही. मेंढ्या राखणाऱ्याला जास्त कसरत करावी लागत नाही.एक मेंढी पुढे गेली की बाकीच्या मेंढ्या तिच्या मागे मागे जातात.शेळ्यांची जात म्हणजे उधळे प्राणीच.शेळ्या कळपात राहून कधीच चरत नसतात.शेळ्या चारही दिशांना एकसारखे पळत असतात.इथला पाला खाऊ की तिथला पाला, अशी हाव शेळ्यांना असते.जर शेळ्यांना शांत प्राणी ही उपाधी दिली तर तो शांत शब्दाचा घोर अपमान होईल.अशा प्राण्यांना उंटावर बसून हाकणे म्हणजे आणखी अवघड काम ठरते. कारण शेळी चपळ व वेगवान प्राणी आहे तर उंट हा मंद व कमी गतीने चालणारा प्राणी आहे.म्हणजे उंटावरुन शेळ्या हाकणे म्हणजे कामाचा आणि कामाच्या गतीचा ताळमेळ नसणे असा आहे.मग कोणत्या क्षेत्रातील कोणते लोक उंटावर बसून शेळ्या हाकण्याचे काम करतात हे पाहणे महत्त्वाचे ठरते. प्रतेक तालुक्याच्या तहसील कार्यालयातील काही कर्मचारी निवडणूकीच्या काळात उंटावरुन शेळ्या हाकण्याचे काम करतात.ते एका जागी बसून राहतात आणि निवडणूक कामाला नियुक्त झालेल्या इतर कार्यालयातील कर्मचाऱ्यांना नुसते आदेश देत राहतात.इकडे या,तिकडे जा,सही करा,निवडणूक साहित्य घ्या, मोजून बघा.शिक्षक,प्राध्यापक, अभियंते व इतर कार्यालयातील हे कर्मचारी तहसील कार्यालयातील सेवकालाही साहेब समजून आपले निवडणूकीचे काम करतात बिचारे! काही अधिकारी अरेतुरेची भाषा वापरुन शिक्षकांना,प्राध्यापकांना दमदाटी करत निवडणूकीचे काम व्यवस्थित करायला सांगतात. दवाखान्यात एका मोठ्या खुर्चीत बसलेला एक व्यक्ती स्वतः कोणतेच काम करत नाही.परंतु, इतर कर्मचाऱ्यांना आदेशावर आदेश देत राहतो.त्याचे आदेश ऐकून इतर आरोग्य कर्मचारी इकडून तिकडे जातात आणि तिकडून इकडे येऊन रुग्णांची देखभाल करतात.पण तो खुर्चीत ऐटीत बसलेला व्यक्ती खुर्चीतून कधीच उठत नाही आणि स्वतः कोणतेच काम करत नाही.हा व्यक्ती मोबाइलवर मात्र खूप व्यस्त असतो. म्हणजे उंटावरुन शेळ्या हाकणे त्याला छान जमते.बँकेत गेल्यावर वेगळेच अनुभव येतात. तेथील सगळे कर्मचारी गंभीर चेहरे करुन बसलेले असतात.त्यांना काही विचारले की पलीकडे जा म्हणतात.पलीकडे गेले की तेथील काउंटरवरील कर्मचारी मध्यभागी असलेल्या कर्मचाऱ्याकडे जाण्यास सांगतात. त्याच्याकडे गेले की तेथून तो मॅनेजर कडे पाठवतो. म्हणजे नुसती टोलवाटोलवी सुरू असते.खरे कोणी सांगत नाही. आणि छोट्या कामासाठी मनस्ताप सहन करावा लागतो.समाजातही काही महाभाग उंटावरुन शेळ्या हाकण्याचे काम करतात. सामाजिक कार्यक्रमामध्ये हे लोक स्वतः काही करत नाहीत आणि जे समाजबांधव समाजासाठी चांगले काम करतात त्यांना काही चुकीचे सांगून समाजकार्याचा बट्ट्याबोळ करतात. प्रत्येक क्षेत्रात असे काही नोकरदार असतात जे उंटावरून शेळ्या हाकत असतात.अशा या लोकांमुळे चांगल्या कामात अडथळा निम ‍र्ण होतो.त्यामुळे इतरांना त्याचा मानसिक त्रास सहन करावा लागतो.म्हणून मनात विचार येतो की उंटावरून शेळ्या हाकणाऱ्या व्यक्तींना सुबुद्धी मिळो आणि त्यांचे हे कार्य कायमचे बंद पडो हीच शुभकामना!



**बबन दामोदर गुळवे**
उमरगा कोर्ट ता.अहमदपूर
जि.लातूर.
मो.९५४५४४२६४८.

## व्यथा मनाच्या

इथे प्रत्येक व्यक्ती स्वार्थी
नाही कोणीच निस्वार्थी
अशा ह्या मतलबी दुनियेत
व्यथा मनाच्या सांगाव्या कोणाला?
लोकांची दुष्कृत्ये
अमानुष कारनामे
डागाळलेले चारित्र्य
असले नमुने दाखवायचे कोणाला?
नात्यांमधील गोडवा
स्वार्थाने बरबटलेला
नात्यांना तोडणारे
जवळ बसवायचे कशाला?
मायबाप वृद्धाश्रमात
स्वतः मग्न बायका पोरांत
निर्दयी औलादींना
फुकटचा जीव लावायचा कशाला?
गुंड प्रवृत्तीच्या लोकांचा
जिकडे तिकडे सुळसुळाट
वेळेवर नांग्या ठेचायच्या
त्यांना मोकळे सोडायचे कशाला?
जाती धर्माचे लोन
आणखी वाढतेय जोमात
भ्रष्टाचार फोफावला
मग थापा मारायच्या कशाला?
राजकारणी लोकांचे नुसते
बेताल वर्तन आणि वक्तव्ये
मतदारांनी अमूल्य मत
मग विकायचे कशाला?

**बबन दामोदर गुळवे**
उमरगा कोर्ट ता.अहमदपूर

# दानशूरांच्या सहकार्यातून उमरगा जिल्हा परिषद हायस्कूलचा विकास

## ॲड.शितल चव्हाण यांचे मत



**आरंभ मराठी | उमरगा**

येथील आयएसओ मानांकित जिल्हा परिषद हायस्कूलमधील दहावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार करून याच कार्यक्रमात शहरातील प्रसिद्ध विधीज्ञ ॲड. शितल चव्हाण यांनी शाळेला डायस भेट दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा शकुंतला मोरे होत्या. प्रमुख पाहुण्यांमध्ये उद्योजक एल.टी. मोरे, व्यापारी महासंघाचे माजी अध्यक्ष सिद्धाराम चिंचोळे, ॲड. प्रवीणचंद्र तोतला, मंगेश देशमुख, रोटरी क्लब अध्यक्ष डॉ. धनंजय मेनकुदळे आदी मान्यवर उपस्थित होते. या वेळी बोलताना ॲड .शितल चव्हाण म्हणाले, दानशूर व्यक्तींच्या सहकार्यातून गरीब विद्यार्थ्यांचे जीवन उजळत आहे. या शाळेचा विकास समाजासाठी प्रेरणादायी ठरावा. कार्यक्रमात सुमारे ३५ हजार रुपयांची बक्षिसे गुणवंत विद्यार्थ्यांना देण्यात आली. यामध्ये प्रथम येणारी सृष्टी बिराजदार, द्वितीय ममता वरवटे, तसेच मुलांमधील प्रथम साहिल बानकर यांसह इतर विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.यंदा शाळेचा निकाल शंभर टक्के लागल्याने शिक्षक बशीर शेख, धनराज तेलंग, विद्यानंद सुत्रावे, फजल शेख, पूजा गुंडीले आदींचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार झाला.मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांनी प्रास्ताविक केले. सरिता उपासे यांनी सूत्रसंचालन तर शिल्पा चंदनशिवे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक व पालकांनी परिश्रम घेतले.

आरंभ मराठी — काँग्रेस जिल्हाध्यक्ष धीरज पाटील यांच्या हस्ते प्रतिमा पूजन

# भूम तालुका काँग्रेसच्या वतीने स्व.राजीव गांधी यांची जयंती साजरी

**आरंभ मराठी | भूम**

नगरपरिषद कार्यालय समोर तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने भारताचे माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ऍड. धीरज पाटील यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून व पुष्प अर्पण करण्यात आले.या प्रसंगी महाराष्ट्र काँग्रेस कमिटीचे प्रदेश सचिव पांडुरंग कुंभार, मुख्य संघटक राजाभाऊ शेरखाने, जिल्हा उपाध्यक्ष विलास शाळू, प्रशांत पाटील, उमेश राजे निंबाळकर, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष आयुब पठाण, ऍड. जावेद काजी, अग्निवेश शिंदे, भूम तालुका काँग्रेसचे अध्यक्ष रुपेश शेंडगे, कार्याध्यक्ष ऍड. सिराज मोगल, दादासाहेब दळवी, ऍड. अमृता गाढवे, मोईज सय्यद शेखापूरकर, समयोदिन काजी, दत्ता तांबे, सोपान वरवडे, प्रभाकर डोंबाळे, फिरोज बागवान, समाधान इंदलकर, मोहम्मद पटेल, अण्णा महानवर, वाहेद कुरेशी, राम सावंत, राजाभाऊ सरवदे, भीमराव देशमुख, शेरखान पठाण, ताहेर पटेल, रामभाऊ शेळके, कैलास शिंदे, सादिक शेख, इकबाल पठाण, राजाभाऊ सरवदे, सचिन वाघ, बादशाह शेख, लियाकत पठाण यांच्यासह अनेक कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.



# माळकरंजा गावात हर घर तिरंगा अभियान




**आरंभ मराठी | कळंब**

माळकरंजा येथील प्रल्हाद तूपसौंद्रे यांच्या मातृ-पितृ छाया या निवासस्थानी हर घर तिरंगा अभियान अंतर्गत विशेष ध्वजारोहण सोहळा पार पडला. देशासाठी सीमेवर लढणारे जवान मुळे व मोहिते यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.कार्यक्रमाच्या निमित्ताने जवानाचे वडील अशोक कराड, माजी सैनिक संतोष कराड, मेजर लोमटे, मेजर गोडसे, तंटामुक्ती अध्यक्ष दादा तांबे, तानाजी सारंग यांची विशेष उपस्थिती लाभली. तसेच गावातील शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांचीही उपस्थिती होती. यामध्ये जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक भोजने व सहशिक्षक गाढवे , माध्यमिक विद्यालय- मुख्याध्यापक गाढवे , ग्रामसेवक कोरे माजी शिक्षक कल्याण सर यांचा समावेश होता.याशिवाय वारकरी संप्रदायाचे गणपत माने, सिद्धेश्वर मुळे, बाबासाहेब मुळे, रमेश लोमटे यांच्यासह गावातील अनेक प्रतिष्ठित मंडळी या राष्ट्रीय सोहळ्याला उपस्थित होती.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८०,विभागीय कार्यालयः सेक्टर नंबर ३२४, ई वॉर्ड, रिवोल्युशन, ऑफिस नंबर युजी ०७,स्टेशन रोड, करवीर, कोल्हापूर RNI NO.- 2023/90078,

# पावसाळ्यात वादळी वाऱ्यात वीजतार तुटल्यास स्पर्श करू नका

## महावितरणचा इशारा

आरंभ मराठी | धाराशिव

पावसाळ्यात व वादळी वाऱ्यात वीजेचे खांब किंवा तारा तुटून पडण्याच्या घटना वाढतात. अशावेळी नागरिकांनी वीज यंत्रणेपासून सुरक्षित अंतर राखावे, कोणत्याही तुटलेल्या तारेला किंवा पोलला स्पर्श करू नये, असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

महावितरणकडून स्पष्ट करण्यात आले आहे की, जमिनीवर पडलेली किंवा लोंबकळणारी तार अजूनही विद्युत प्रवाहाने युक्त असू शकते. त्यामुळे अशा तारांच्या जवळ जाणे हे जीवघेणे ठरू शकते. अपघात टाळण्यासाठी त्वरित महावितरण कार्यालयाशी संपर्क साधावा किंवा टोल–फ्री क्रमांकावर माहिती द्यावी.



आपत्कालीन संपर्क क्रमांक टोल फ्री १९१२

धाराशिव जिल्हा कंट्रोल रूम ७८७५२११६१५ (व्हॉट्सॲप सुविधेसह)

पावसाळ्यात वीजेपासून सुरक्षित राहण्यासाठी महत्त्वाच्या सूचना विजांचा कडकडाट होताच सर्व विद्युत उपकरणे बंद करून मुख्य कनेक्शन वेगळे करावे.घरातील अर्थिंग व्यवस्थित ठेवून वेळोवेळी तपासणी करावी.तुटलेल्या किंवा लोंबकळणाऱ्या वीजतारांपासून दूर राहावे व तातडीने महावितरणला माहिती द्यावी. कपडे वाळवण्यासाठी लोखंडी तारांचा वापर टाळावा.स्वीचबोर्ड, फ्यूज बॉक्स व उपकरणे पाण्यापासून सुरक्षित ठेवावीत.ओल्या हातांनी उपकरणे हाताळू नयेत.डिश अँटेना वीजतारांपासून दूर ठेवावेत.विजा चमकत असताना बाहेर पडणे, धातूच्या वस्तू जवळ ठेवणे टाळावे.झाडांच्या फांद्यांमुळे पडलेल्या तारांपासून सुरक्षित अंतर राखावे.महावितरणकडून नागरिकांना अपघात टाळण्यासाठी सतर्क राहण्याचे आणि सावधगिरी बाळगण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या खबरदारीच्या उपाययोजनांमुळे जीवितहानी टाळता येईल, असेही महावितरणने स्पष्ट केले.

# साहित्य भारती तर्फे लेखक आपल्या भेटीला उपक्रम

आरंभ मराठी | धाराशिव

अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारतीच्या वतीने 'लेखक आपल्या भेटीला' हा उपक्रम घेण्यात आला. नाशिक जिल्ह्यातील प्रख्यात साहित्यिक डॉ राजेंद्र मलोसे यांनी त्यांच्या साहित्यिक वाटचालीविषयी अनुभव कथन करताना सुरुवातीच्या काळातच व्ही व्ही चिपळूणकर यांच्यासारख्या थोर विचारवंत व साहित्यिकाचा परिसस्पर्श झाला आणि त्यांनी केलेल्या मार्गदर्शनामुळे डॉक्टर झाल्यावर शहरी भागात काम न करता नाशिक जिल्ह्यातील चांदवड सारख्या दुर्गम भागात सपत्नीक सेवा दिली आणि त्या अनुभवातून स्वप्नपंख, गाथा सप्तपदी अशा प्रचंड खप झालेल्या सहा कादंब–यांचा जन्म झाला असे सांगत हा प्रवास किती कष्टप्रद होता तरीही आनंदाने केला असे सांगितले. त्याचबरोबर लेखकाने पुस्तक काढण्याची घाई न करता आपण लिहिलेल्या साहित्यावर योग्य प्रकारे परिष्करण करावे व मग साहित्यकृती जन्माला घालावी असाही सल्ला दिला.

धाराशिव येथील साहित्यिक मंडळींनी देखील डॉ राजेंद्र मलोसे यांच्याशी विविध विषयांवर चर्चा केली. यावेळी डॉ मलोसे यांच्या साहित्यिक योगदानाबद्दल साहित्य भारती धाराशिव च्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारती देवगिरी प्रांत मंत्री युवराज नळे, डॉ अभय शहापूरकर, जेष्ठ साहित्यिक राजेंद्र अत्रे, प्राचार्य डॉ प्रशांत एल, सिनेट सदस्य देविदास पाठक, मीना महामुनी, ॲड जयश्री तेरकर, समाधान शिकेतोड, अक्षय मुंडे, ॲड नामदेव तेरकर, योगेश अत्रे, ॲड वैभव अत्रे, राजाभाऊ कारंडे इत्यादी उपस्थित होते.

# बैलपोळ्यासाठी बाजारपेठा सजल्या;पण ग्राहकांची पाठ, व्यापाऱ्यांत नाराजी

आरंभ मराठी | परंडा

अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपलेल्या बैलपोळ्याच्या खरेदीला शेतकऱ्यांनी सुरुवात केली आहे. परंडा शहरासह ग्रामीण भागातील बाजारपेठा सजल्या असल्या तरी दरवर्षीप्रमाणे ग्राहकांची वर्दळ नाही. मुसळधार पावसाने जिल्ह्यात पिकांचे मोठे नुकसान झाल्याने पोळ्याच्या सणावरही विरजण पडले आहे. यामुळे व्यापाऱ्यांत नाराजी व्यक्त होत आहे. परंडा तालुक्यातील बाजारपेठा गोंडे, मातीचे बैल, घुंगरांच्या माळा, झुल, पितळी घंटा, कवड्यांच्या माळा, दिटमणी अशा आकर्षक साहित्याने खुलल्या आहेत. बळीराजा मात्र आपल्या सर्जाराजासाठी सजावटीच्या वस्तूंची खरेदी करताना दिसतो आहे.यंदा जिल्ह्यात समाधानकारक पावसाने पेरणी शंभर टक्के झाली असली तरी मागील आठवड्यातील मुसळधार पावसाने शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर चिंता आणली आहे. पिकांची हानी झाल्याने काही प्रमाणात सणाचा उत्साह कमी झाला आहे. तरीही, बैलांविषयी कृतज्ञतेची भावना व्यक्त करण्याची संधी शेतकरी सोडणार नाहीत.



### बैलाची सेवा करण्याची जबाबदारी

वर्षातून एकदा सर्जाराजासाठी हा सण येतो. दर वाढले तरी माझ्या बैलाला मी मनापासून सजवणारच. पिकांचे नुकसान झाले, पण बैलाची सेवा करणे ही आपली जबाबदारी आहे.

– **विष्णुदास मिसाळ**, शेतकरी, सिरसाव,

# परंडा मतदारसंघातील तिन्ही तालुक्यांचा अतिवृष्टीत समावेश करा

## माजी आमदार राहुल मोटे यांची मागणी

आरंभ मराठी | भूम

परंडा मतदारसंघात गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे पिकांचे, शेतजमिनींचे, घरांचे व जनावरांचे मोठे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर परंडा, भूम व वाशी या तिन्ही तालुक्यांचा अतिवृष्टीग्रस्त क्षेत्रात समावेश करावा, अशी मागणी माजी आमदार राहुल मोटे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.मोटे यांनी दिलेल्या पत्रात नमूद केले आहे की, प्रशासनाच्या सदोष पर्जन्यमापक यंत्रामुळे सध्या फक्त वाशी तालुक्याचा समावेश करण्यात आला असून परंडा व भूम तालुक्यांना वगळण्यात आले आहे. प्रत्यक्षात सर्वच तालुक्यांत गेल्या पाच दिवसांपासून सारख्याच





प्रमाणात मुसळधार पाऊस पडत असून प्रचंड हानी झाली आहे. त्यामुळे तिन्ही तालुक्यांचा समावेश करून पंचनामे करण्यात यावेत व शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी, अशी विनंती त्यांनी केली. दरम्यान, परंडा मतदारसंघातील अनेक रस्त्यावरील पूल वाहून गेले, घरे पडझड झाली, शेतकऱ्यांची उभी पिके वाहून गेली तसेच जनावरांचेही मोठे नुकसान झाले. मात्र या संकट काळात लोकप्रतिनिधींमधून फक्त माजी आमदार मोटेच शेतकऱ्यांच्या खांद्याला खांदा लावताना दिसत आहेत.राज्याचे कृषिमंत्री धाराशिव जिल्हा दौऱ्यावर असताना वाशी येथे आले होते. यावेळी माजी आमदार मोटे यांनी स्वतः अनेक गावांची पाहणी करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना न्याय मिळावा, पंचनामे तातडीने करून नुकसानभरपाई द्यावी, अशी ठाम मागणी कृषिमंत्र्यांकडे केली.

# आदर्श महाविद्यालयातील रोजगार मेळाव्यास प्रतिसाद





आरंभ मराठी | उमरगा

येथील आदर्श महाविद्यालयात सोमवारी पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळाला.

हा मेळावा आदर्श महाविद्यालयातील प्लेसमेंट सेल व पुणे येथील जॉब कनेक्ट इव्हेंट या रघुराम गायकवाड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.पदवी व पदव्युत्तर ज्ञान मिळवल्यानंतर या ज्ञानाचा उपयोग व्यावहारिक शहाणपणामध्ये करण्यासाठी विद्यार्थ्यांना ट्रेनिंगची गरज असते. त्याशिवाय त्याला नोकरी मिळत नाही. हे लक्षात घेऊन विद्यार्थ्यांचा चरितार्थ चालवण्यासाठी नोकरीत महत्त्वाची असते. म्हणून त्याच्या अंगी इतरही अनेक अंतर्गत गुण आणि मूल्ये असावी लागतात. त्या संबंधीची ट्रेनिंग आदर्श महाविद्यालयात सुरू करण्यात आली. या ट्रेनिंगचा लाभ महाविद्यालयातील दोनशे विद्यार्थी घेत आहेत. या अनुषंगाने त्याच्या उद्घाटनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य राम सोलंकर तर प्रमुख

मार्गदर्शक म्हणून ऋषिकेश खोत, जगताप व कंपनीचे प्रकल्प अधिकारी रघुराम गायकवाड उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. लक्ष्मण बिराजदार यांनी केले. या संधीचे सोने करून विद्यार्थ्यांनी आपले आयुष्य घडवावे असे आवाहन प्राचार्य डॉ. राम सोलंकर यांनी केले.या ट्रेनिंग सेंटरचा लाभ महाविद्यालयातील अडीचशे विद्यार्थी घेत आहेत.

# अजा एकादशी वारी: भक्तिरसात न्हाऊन निघाली तेर नगरी

## संत गोरोबाकाकांच्या चरणी पन्नास हजारांहून अधिक भाविक नतमस्तक






आरंभ मराठी | तेर

श्रावणातील अजा एकादशी वैराग्याचे प्रतीक, संतश्रेष्ठ गोरोबाकाकांच्या पवित्र वारीचा दिवस. या दिवशी तेर नगरीत भक्तिरसाचा महापूर उसळला. पन्नास हजारांहून अधिक भाविकांनी संतचरणी माथा टेकून आत्मिक समाधानाचा अनुभव घेतला.पहाटेपासूनच संतांच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. टाळ–मृदंगांचा मंजुळ निनाद, अभंगांचे स्वर आणि हरिनामाच्या गजराने वातावरणात एक विलक्षण उर्जा संचारली होती. भाविकांच्या डोळ्यांतून ओघळणारे आनंदाश्रू हीच खरी भक्तीची साक्ष देत होते.मंदिरातील दोन्ही मंडप क्षणात भरून गेले. प्रशासक रूपाली कोरे, निरीक्षक अतुल नळणीकर व व्यवस्थापक साहेबराव सौदागर यांच्या मार्गदर्शनाखाली भाविकांसाठी दर्शनाची सुलभ व्यवस्था करण्यात आली. ढोकी पोलिसांनी परिसरात बंदोबस्त ठेवून शिस्त राखली. दरम्यान, धाराशिवलातूर राज्य मार्गावर वाहनांच्या लांबलचक रांगा लागल्या होत्या. प्रवासात विलंब झाला तरीही भाविकांच्या मनातील समाधान ढळले नाही. संपूर्ण तेर नगरी या दिवशी भक्तिभाव, श्रद्धा व अध्यात्मिक आनंदाने उजळून निघाली.असा विश्वास व्यक्त करण्यात आला की, संत गोरोबाकाकांच्या या वारीमुळे प्रत्येक भाविकाच्या अंतःकरणात श्रद्धेचा दीप अधिक प्रज्वलित झाला आहे.

आरंभ मराठी

## महाविद्यालयाच्या वतीने राजीव गांधी यांच्या प्रतिमेला अभिवादन

# के.टी.पाटीलऔषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात सद्भावना दिवस उत्साहात




आरंभ मराठी | धाराशिव

भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या स्मरणार्थ दरवर्षी २० ऑगस्ट रोजी साजरा केला जाणारा सद्भावना दिवस आज आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ संचलित के.टी. पाटील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल जोशी यांनी राजीव गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून केली. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, सद्भावना दिवस हा समाजातील एकात्मता आणि सामूहिक बांधिलकी वाढवण्याचा दिवस आहे. जात, धर्म, भाषा आणि प्रांतिक भेद विसरून एकमेकांबद्दल आदर व सौहार्द वाढवणे हीच खरी गरज आहे.

### राजीव गांधींचे योगदान

कार्यक्रमात राजीव गांधी यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. त्यांनी भारतात तंत्रज्ञान व संगणक क्रांतीला चालना दिली, शिक्षण, दूरसंचार आणि विज्ञान–तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या. त्यांच्या दूरदृष्टीमुळे भारताने माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात नवे युग सुरू केले. म्हणूनच ते आधुनिक भारताचे शिल्पकार म्हणून ओळखले जातात.

### कार्यक्रमातील सहभाग

या कार्यक्रमात विद्यार्थी व शिक्षकांनी राष्ट्रहित, सामाजिक एकात्मता आणि सौहार्द या विषयांवर विचारांची देवाणघेवाण केली. तसेच रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. अतुलकुमार अलकुंटे, उपकार्यक्रमाधिकारी प्रा. शिवरत्न खरे, प्रा. पल्लवी हंगरगेकर यांच्यासह स्वयंसेवक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# नारंगवाडी येथे सलग दुसऱ्यांदा आकाश पवार तंटामुक्त अध्यक्ष




आरंभ मराठी | नारंगवाडी

उमरगा तालुक्यातील नारंगवाडी येथे बुधवार, २० ऑगस्ट रोजी ग्रामपंचायत कार्यालयात घेण्यात आलेल्या ग्रामसभेत अनेक ठराव संमत करण्यात आले. त्याचबरोबर तंटामुक्त अध्यक्ष आणि उपाध्यक्ष पदाची निवड झाली. या वेळी अध्यक्षपदासाठी चार उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. मतदानाद्वारे झालेल्या निवड प्रक्रियेत आकाश भालचंद्र पवार व हनमंत महादेव सांगवे या दोघांना प्रत्येकी ७७ मते मिळाली, तर उर्वरित दोन उमेदवारांना ८ व १४ मते मिळाली. एकूण १७६ मतांपैकी समान मते मिळाल्याने परिस्थिती गुंतागुंतीची झाली. अखेरीस चिट्ठी टाकण्याची वेळ आली आणि त्यातून आकाश भालचंद्र पवार यांची तंटामुक्त अध्यक्षपदी निवड झाली, तर हनमंत महादेव सांगवे उपाध्यक्षपदी निवडले गेले.नवीन पदाधिकाऱ्यांचा सत्कार गावचे पोलीस पाटील हेमंत पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.

### ग्रामसभेत उपस्थित मान्यवर

या वेळी सरपंच शेखर घंटे, उपसरपंच कुमार बापू पवार, ग्रामसेवक जगदीश जाधव, श्रीधर सांगवे, लखन जाधव, तसेच ग्रामपंचायत सदस्य व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संजय पवार, रघु आष्टे, चंदु मुळे, खंडू पवार, प्रशांत कांबळे, बंडु पवार, मुकेश आष्टे, प्रवीण कारागीर, प्रशांत सांगवे, मनोज पवार, राहुल मुगळे, अर्जुन पवार, किशोर सांगवे, हणमंत पवार, गणेश कोकाटे, पांडुरंग पवार, दीपक पवार आदींनी नव्या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

www.arambhmarathi.com

दैनिक आरंभ मराठी

आपलं धाराशिव

गुरुवार, दि.21ऑगस्ट 2025

# धाराशिवच्या आरोग्य सेवेत सुधारणा; रुग्णांना सोलापूरला रेफर करण्याचे प्रमाण घटले

## अधिष्ठाता डॉ.शैलेंद्र चौहान यांच्या कामगिरीचे पालकमंत्र्यांकडून कौतुक

### किचकट शस्त्रक्रिया, तातडीचे उपचार मिळू लागण्याचे समाधान

**आरंभ मराठी | धाराशिव**

जिल्ह्याचे ठिकाण असलेल्या धाराशिवमध्ये आरोग्यसेवांचा दर्जा चार वर्षांपूर्वी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू झाल्यापासून झपाट्याने उंचावत आहे. जिल्ह्यातील रुग्णांना पूर्वी अत्यावश्यक उपचारांसाठी सोलापूर, पुणे किंवा हैदराबादकडे धाव घ्यावी लागायची. मात्र आता धाराशिवमधील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय हे जिल्ह्यातील आरोग्यसेवेचे प्रमुख केंद्र बनले असून, तातडीचे रुग्ण इथेच उपचार घेऊन बरे होत आहेत. अधिष्ठाता डॉ. शैलेंद्र चौहान यांच्या नेतृत्वाखाली डॉक्टर, परिचारिका व वैद्यकीय कर्मचारी यांनी आरोग्यसेवेत अमूल्य योगदान दिले आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे काही दिवसांपूर्वी केवळ पंधरा दिवसांच्या कालावधीत तीनपेक्षा अधिक देहदान झाले. धाराशिवमध्ये ही घटना ऐतिहासिक ठरली आहे. अवयवदानासारख्या सामाजिक चळवळीला गती मिळत असून, जिल्ह्यातील लोकांमध्ये जनजागृती वाढत आहे. या रुग्णालयात मागील काही महिन्यांत अनेक दुर्मिळ व गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या करण्यात आल्या आहेत. मणक्याची शस्त्रक्रिया, जबड्याची शस्त्रक्रिया, आर्थोस्कोपी, प्रोस्टेट तसेच लॅप्रोस्कोपिक पद्धतीच्या जटिल शस्त्रक्रिया आता धाराशिवमध्ये नियमितपणे होत आहेत. पूर्वी अशा उपचारांसाठी रुग्णांना मोठ्या खर्चाने सोलापूरसह बाहेरगावी जावे लागे. आज ही सेवा स्थानिक पातळीवर उपलब्ध झाल्याने रेफर होणाऱ्या रुग्णांचे प्रमाण तब्बल २५ टक्क्यांनी घटले आहे. रुग्णसेवा सक्षम करण्यासाठी अधोसंरचनेतही लक्षणीय वाढ झाली आहे. शस्त्रक्रियागृहांची संख्या ४



वरून ८ पर्यंत वाढवण्यात आली, तर अतिदक्षता विभागातील (ICU) बेड संख्या ५ वरून १२ करण्यात आली आहे. लवकरच अत्यावश्यक असलेले मशीन सुरू होणार असून, धाराशिवकरांना प्रगत निदान सुविधांचा लाभ जिल्ह्यातूनच मिळणार आहे. डिजिटल इंडिया मिशनअंतर्गत Next Gen HMIS प्रणाली रुग्णालयात सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे रुग्णांच्या नोंदी व अहवाल आधार क्रमांक किंवा मोबाईल नंबरच्या आधारे तत्काळ उपलब्ध होणार आहेत. यामुळे उपचार प्रक्रियेत वेग आणि पारदर्शकता वाढली आहे. वैद्यकीय शिक्षणाच्या दृष्टीनेही या महाविद्यालयाने यश मिळवले आहे. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक तर्फे साठी परवानगी मिळाली आहे. तसेच नवी दिल्लीतील डीएनबी संस्थेने शल्यचिकित्सा व स्त्रीरोग विभागातील दोन पदव्युत्तर जागांना मान्यता दिली आहे. यामुळे धाराशिवमध्येच उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अत्याधुनिक ज्ञानाचा लाभ होणार आहे.



#### पालकमंत्र्यांकडून कौतुक

यामुळे धाराशिव जिल्ह्यातील आरोग्यसेवा गुणवत्तेच्या नव्या उंचीवर पोहोचली आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी रुग्णालयास भेट देऊन अधिष्ठाता डॉ. शैलेंद्र चौहान,अधीक्षक डॉ.तानाजी लाकाळ व त्यांच्या टीमचे विशेष कौतुक केले. धाराशिव जिल्ह्यातील जनतेसाठी हा परिवर्तनाचा टप्पा आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाने अपेक्षेपेक्षा अधिक वेगाने प्रगती केली आहे. डॉक्टरांच्या अथक परिश्रमांमुळे जिल्ह्यातील लोकांना मोठा दिलासा मिळत आहे,असेतेम्हणाले.

# एमकेसीएलचा रौप्य महोत्सवी वर्धापन दिन उत्साहात साजरा



**आरंभ मराठी | तुळजापूर**

महाराष्ट्र ज्ञान महामंडळ या संस्थेचा रौप्य महोत्सवी वर्धापन दिन येथील अष्टभुजा कॉम्प्युस्किल्स अँड करियर डेस्क येथे उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओमप्रकाश राजनकर, तुळजाभवानी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जीवन पवार, यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद गायकवाड, कुलस्वामिनी उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य आर. एस. ठोंबरे, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे प्रशालेचे पर्यवेक्षक पी. बी. क्षीरसागर, लोकसेवा फाउंडेशनचे अध्यक्ष पंकज शहाणे, प्रा. व्ही. व्ही. पतंगे, प्रा. डॉ. नेताजी काळे, प्रा. जी. पी. ओवरीकर, प्रा. विवेक गंगणे, प्रा. सचिन सगरे व प्रा. नितीन बिराजदार यांची उपस्थिती होती. डॉ. आनंद मुळे यांनी प्रास्ताविकात एमकेसीएलच्या २५ वर्षांच्या प्रवासाचा आढावा घेतला. एमकेसीएल मार्फत राबविले जाणारे विविध करियर ओरिएंटेड कोर्सेस तसेच इतर सामाजिक उपक्रम याची माहिती दिली. उपस्थित सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांना आर्टिफिशियल इंटेलिजन्स या आधुनिक तंत्रज्ञानाला जुळवून घेणे काळाची गरज असल्याचे आपल्या शुभेच्छा संदेशामध्ये नमूद केले. सूत्रसंचालन कु. साक्षी दहीहंडे व कु. आदिती भालेराव यांनी तर आभार संस्थेच्या संचालिका सौ. सोनाली मुळे यांनी मानले. सदर कार्यक्रमाला तुळजापूर शहरातील सर्व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची मोठी उपस्थिती होती.

# रुपामाता विद्यालयाचे सात विद्यार्थी जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी पात्र

**आरंभ मराठी | धाराशिव**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर दाखवलेले यश संपूर्ण तालुक्याचा गौरव वाढवणारे ठरले आहे. रुपामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पाडोळी (आ.) येथील सात विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धे साठी निवड झाली आहे.तेरणा सहकारी साखर कारखाना प्रशाला, तेरणा नगर (ढोकी) येथे झालेल्या तालुकास्तरीय स्पर्धे त सुजाता सतीश शिंदे, संचित व्यंकट गुंड, मानसी गणपती गुंड, रेनुका सतीश चव्हाण, गणेश कलिकेश गाते, आदित्य सुखलाल गुंड आणि नरहरी गोविंद मुळे यांनी चमकदार कामगिरी करीत जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली.या यशाबद्दल जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. व्यंकटराव विश्वनाथ गुंड, जिल्हा परिषदेचे




माजी उपाध्यक्ष सुधाकर गुंड गुरुजी, शिक्षण विस्तार अधिकारी बापू शिंदे, समुद्रवाणी केंद्राचे केंद्रप्रमुख चाऊस सर, तालुका क्रीडा संयोजक बिभीषण पाटील, माजी मुख्याध्यापक व बुद्धिबळ राष्ट्रीय पंच गोरे सर, राज्यस्तरीय पंच महादेव भोरे, रुपामाता विद्यालयाचे मुख्याध्यापक सुरेश मनसुळे, मुख्याध्यापक सूर्यवंशी, क्रीडाशिक्षक शेख आणि जावळे, शाळेतील सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व शिक्षणप्रेमींनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आणि जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# तुळजापूरमधील नियोजित १०८ फूट उंचीच्या शिल्पासाठी फायबर मॉडेल सादरीकरणाला मुदतवाढ

**आरंभ मराठी | धाराशिव**

धाराशिव; श्री तुळजाभवानी तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत तुळजापूर येथे १०८ फूट उंचीचे भव्य ब्राँझ धातूचे शिल्प उभारण्यात येणार आहे. हे शिल्प छत्रपती शिवाजी महाराजांना श्री तुळजाभवानी देवी आशीर्वाद देत असलेल्या ऐतिहासिक प्रसंगावर आधारित असणार आहे.या शिल्पाच्या मूळ आराखड्यासाठी महाराष्ट्र राज्याच्या कला संचालनालयाच्या मार्गदर्शनाखाली २.५ ते ३ फूट उंचीच्या फायबर मॉडेल्स मागविण्यात आली आहेत.हे मॉडेल्स तयार करण्यासाठी इच्छुक शिल्पकारांकडे शिल्पकलेतील पदवी अथवा पदविका तसेच किमान १५ वर्षांचा व्यावसायिक अनुभव असणे आवश्यक आहे. तयार झालेल्या फायबर मॉडेल्सपैकी निवड समितीद्वारे एकूण ५ मॉडेल्सची निवड करण्यात येईल. निवड झालेल्या प्रत्येक मॉडेल सादरकर्त्याला १.५ लाख रुपये मानधन दिले जाईल,तर अंतिम निवड झालेल्या मॉडेल सादरकर्त्याला १० लाख रुपयांचे मानधन देण्यात येणार आहे. हे मॉडेल्स तयार करताना इतिहास व धार्मिक संदर्भांचा विचार करणे बंधनकारक असून,त्यासाठी शिल्पकारांनी इतिहासकार तसेच पुरातत्व विभागाने उपलब्ध करून दिलेले संदर्भ अभ्यासणे आवश्यक आहे.

# परंडा मतदारसंघातील शेतकऱ्यांना मंजूर ३ कोटी ३२ लाखांची मदत तातडीने वितरित करा: माजी आमदार राहुल मोटे

**आरंभ मराठी | भूम**

भूम परंडा, भूम आणि वाशी तालुक्यात एप्रिल–मे २०२५ मध्ये झालेल्या अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे बाधित शेतकऱ्यांना मंजूर झालेली मदत तात्काळ वितरित करण्यात यावी, अशी मागणी परंडा विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार राहुल मोटे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.त्या काळात परंडा तालुक्यातील ६८२ हेक्टर, भूम तालुक्यातील ५४४ हेक्टर, तर वाशी तालुक्यातील ६४६.७५ हेक्टर क्षेत्रातील शेती पिकांचे मोठे नुकसान झाले होते. एकूण ४४३६ शेतकरी बाधित झालेले आहेत.नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानीसाठी राज्य आपत्ती प्रतिसाद निधीतून शेतकऱ्यांना निविष्ठा अनुदानाच्या स्वरूपात मदत दिली



जाते. त्याच अनुषंगाने या नुकसानीसाठी ३ कोटी ३२ लाख रुपये मंजूर झालेले आहेत. परंतु ही रक्कम अद्याप शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झालेली नाही.शेतकऱ्यांवर हंगामावर हंगाम येऊन ओढवणाऱ्या संकटांचा विचार करता मंजूर निधी त्वरित शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात यावा,'' अशी मागणी मोटे यांनी केली आहे.

# सातारा जिल्ह्यात पावसाची विश्रांती;मात्र, पूर आणि आपत्तीची भीती कायम

## पाटण, कराड,जावळी,वाई, सातारा येथील ३६१ कुटुंबांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर

**आरंभ मराठी | सातारा**

सातारा जिल्ह्याला मुसळधार पावसाने झोडपून काढले, परिणामी धरणांमधून सोडण्यात येणाऱ्या पाण्यामुळे पूरस्थिती निर्माण झाली.जनजीवन ठप्प झाले. दरम्यान,दुपारनंतर जिल्ह्यात पावसाचा जोर कमी झाला असून, आपत्ती निवारण कक्षाचे मदत कार्य सुरू झाले आहे.पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी या सर्व परिस्थितीचा आढावा घेत तातडीने मदतीच्या सूचना दिल्या आहेत. जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी पाटण तालुक्याचा दौरा करून नागरिकांशी पूर सदृश्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर संवाद साधला जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी पाटण तालुक्यातील नावडी पाटण व कोयना विभागातील हेळवाक या ठिकाणी पूरग्रस्तांशी संवाद साधून त्यांना दिलासा दिला.



कोयना धरणाचे दरवाजे तेरा फुटांवर स्थिर ठेवण्यात आले असून, कोयना धरणातून ९५ हजार ३०० क्युसेक पाण्याचा विसर्ग कोयना नदीपत्रात करण्यात येत आहे. जिल्ह्यातील पाटण, वाई, जावळी, कराड, महाबळेश्वर व सातारा या ठिकाणी प्रचंड मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली. जिल्ह्यातील १२९ कुटुंबातील ३६१ नागरिकांचे तात्पुरते स्थलांतर करण्यात आले आहे. कोयना धरणासह धोम बलकवडी,कण्हेर, उरमोडी,तारळी या प्रमुख धरणामधून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरू आहे.

# जवळा फाटा बस स्टॉपची दुरवस्था; प्रवाशांचे हाल

**आरंभ मराठी | जवळा**

परांडा तालुक्यातील जवळा (नि.) फाटा येथील बस स्टॉपची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून, पावसाळ्यात प्रवाशांचे हाल अधिकच वाढले आहेत. दोन बाजूंना बांधलेले बस स्थानक असले तरी एका बाजूचे स्थानक पूर्णपणे निकृष्ट स्थितीत आहे. बसस्थानकाच्या छतावरील पत्रे फाटले असून परिसर गवत व वेलींच्या विळख्यात गुदमरलेला दिसतो. ही इमारत वापरास अयोग्य झाल्याने प्रवाशांना रस्त्याच्या कडेला उभे राहून बसची प्रतीक्षा करावी लागते. पावसाळ्यात तर परिस्थिती अधिकच बिकट होत असून, प्रवाशांना शेजारील दुकानांचा अडोसा घ्यावा लागतो. अचानक बस आल्यानंतर प्रवाशांना



पळत जाऊन बस पकडावी लागत असल्याने मोठा त्रास सहन करावा लागत आहे. ग्रामस्थ व प्रवासी यांनी बांधकाम विभागासह परिवहन महामंडळाकडे या बसस्थानकाची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे. त्याचबरोबर येथे पिण्याच्या पाण्याची आणि शौचालयाची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणीही जोर धरत आहे.

## आरंभ मराठी आमदार डॉ. तानाजी सावंत यांच्या सूचना

# परंडा मतदारसंघात सरसकट पंचनामे करा

**आरंभ मराठी | भूम**

भूम, परंडा आणि वाशी या तीन तालुक्यांमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. मात्र नुकसानीचा पंचनामा न करताच वाशी तालुक्याचा सरसकट अतिवृष्टीग्रस्त भागात समावेश करण्यात आला होता. ही बाब कार्यकर्त्यांनी लक्षात आणून दिल्यानंतर आमदार डॉ. तानाजी सावंत यांनी तत्काळ तीनही तालुक्यांच्या तहसीलदारांना थेट भ्रम



णध्वनीवरून संपर्क साधत एकही गाव पंचनाम्याविना राहू नये अशा कडक सूचना दिल्या.शेतकऱ्यांना न्याय मिळालाच पाहिजे सावंततहसीलदारांशी बोलताना आमदार सावंत म्हणाले, गावपातळीवरील कर्मचारी टाळाटाळ करतील तर ती बाब आमच्या निदर्शनास आणून द्या. शेतकऱ्यांचा पंचनामा करून त्यांना न्याय देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे.व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल डॉ. सावंत यांनी तहसीलदारांना दिलेल्या या थेट सूचनांचा व्हिडिओ सध्या मतदारसंघात मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून पंचनाम्याच्या कामाला वेग येणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.नाराजीनंतरही सावंतांची लक्षवेधी हालचाल निवडणुकीपासून मतदारसंघापासून दूर राहिलेले आणि कार्यकर्त्यांत नाराजीचे वातावरण असतानाही डॉ. तानाजी सावंत मतदारसंघावर लक्ष ठेवून आहेत, हे या घटनेतून स्पष्ट झाले आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर त्यांनी दाखवलेली तत्परता कार्यकर्त्यांमध्ये चर्चेचा विषय ठरली आहे.अतिवृष्टीमुळे मोठे नुकसान भूम, परंडा आणि वाशी तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे कापूस, सोयाबीन, तूरसह विविध पिकांचे मोठे नुकसान झाले असून हजारो शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. अशा परिस्थितीत सरसकट पंचनाम्याचे आदेश मिळाल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.

# तेर येथे संत सेना महाराज पुण्यतिथी उत्सव श्रद्धाभावाने साजरा

**आरंभ मराठी | तेर**

तेर (ता. धाराशिव) या संतभूमीत संत शिरोमणी संत सेना महाराज यांची पुण्यतिथी मोठ्या श्रद्धाभावाने साजरी करण्यात आली. भक्तिभावाच्या वातावरणात संत सेना महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात झाली.संत सेना बाबांचे कीर्तन, भजने व अभंग, यामुळे परिसरात अध्यात्मिक वातावरण निर्माण झाले. संतांच्या विचारांचे स्मरण करून उपस्थितांनी त्यांच्या साधेपणाचे व समाजाभिमुख कार्याचे अनुकरण



करण्याचे आवाहन केले.याप्रसंगी आप्पासाहेब चौगुले, धोंडीराम कस्तुरे, महादेव कचरे, अमोल कस्तुरे, शशिकांत काळे, लक्ष्मण राऊत, सुरेश माने, पांडुरंग जगदाळे, हनुमंत घोडके, काका राऊत, जनकराज जगदाळे, वैजनाथ राऊत, उमाकांत सम्राट, समाधान राऊत, धनंजय सूर्यवंशी, सुभाष सम्राट, ओम सूर्यवंशी, संदीप राऊत, काका सुरवसे, सोमनाथ यादव, प्रथमेश राऊत, गौरव कचरे, रोहित राऊत, चंद्रकांत घोडके आदी मान्यवर उपस्थित होते.